महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण
जनसंपर्क विभाग
कक्ष क्र. १९/२० तळ मजला, गृहनिर्माण भवन, कला नगर, वांद्रे पूर्व, मुंबई – ४०००५१.
दू.क्र. ०२२-६६४०५०६६/७७. ईमेल : cpromhadaoffice@gmail.com

म्हाडा
MHADA

==========================================================

जावक क्रमांक – ७४२ /४४ दिनांक :- ०८ एप्रिल, २०२५

प्रसिद्धिपत्रक

# गृहनिर्माण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या अध्यक्षतेखाली म्हाडा मुंबई मंडळाच्या कार्याचा आढावा

**प्रकल्प वेळेत पूर्ण करण्यासाठी, सेवा वितरण प्रक्रियेचा दर्जा अधिक कार्यक्षम करण्यासाठी स्पष्ट निर्देश**

मुंबई, ८ एप्रिल २०२५: महाराष्ट्र राज्याचे गृहनिर्माण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी आज वांद्रे (पूर्व) येथील म्हाडा मुख्यालयात भेट देऊन मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळाच्या विविध योजनांचा आढावा घेतला. या बैठकीत प्रकल्पांची अंमलबजावणी, लाभार्थ्यांच्या पुनर्वसनाची प्रक्रिया, तसेच नागरी सुविधा आणि प्रशासकीय कार्यपद्धती यांचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

या बैठकीस मुंबई मंडळाचे मुख्य अधिकारी श्री. मिलिंद बोरीकर (भा.प्र.से.), उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अनिल वानखडे, सहमुख्य अधिकारी श्रीमती वंदना सूर्यवंशी, तसेच संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

बैठकीत मंत्री महोदयांनी पुनर्विकास योजनांच्या अंमलबजावणीचा आणि लाभार्थ्यांशी संबंधित प्रक्रियेचा तपशीलवार आढावा घेतला. प्रकल्प अंमलबजावणीचे टप्पे वेळेत पूर्ण व्हावेत, लाभार्थ्यांना नियमानुसार घरे मिळावीत आणि पुनर्वसनाशी संबंधित सर्व प्रक्रिया सुसूत्रपणे पार पडाव्यात, यासाठी आवश्यक ती कार्यवाही तातडीने करण्यात यावी, असे निर्देश त्यांनी अधिकाऱ्यांना दिले.

तक्रार निवारण, लाभार्थ्यांशी संवाद आणि सेवा वितरण प्रक्रियेचा दर्जा उंचावण्यासाठी ठोस आणि उत्तरदायित्वात्मक यंत्रणा कार्यान्वित करण्यात याव्यात, असेही मंत्री महोदयांनी स्पष्टपणे सांगितले. नागरी हित लक्षात घेऊन प्रकल्पांचे नियोजन आणि अंमलबजावणी होणे अत्यावश्यक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. पुनर्विकास योजनांच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक असलेल्या परवानग्या, नगररचना मंजुरी, वीज, पाणी व इतर पायाभूत सुविधांच्या संलग्न कामांमध्ये संबंधित शासकीय यंत्रणांशी समन्वय साधण्याचे निर्देशही त्यांनी दिले. यासोबतच, प्रत्येक प्रकल्पाच्या प्रगतीचा तपशील शासनाला सादर करण्यात यावा आणि त्यामध्ये अंमलबजावणीची अचूक माहिती नमूद असावी, असे त्यांनी सांगितले.

बैठकीच्या समाप्तीप्रसंगी मंत्री डॉ. भोयर यांनी नमूद केले की, म्हाडाच्या माध्यमातून होणारी गृहनिर्माण व्यवस्था तसेच शासनाच्या गृहनिर्माण धोरणांनुसार, लाभार्थ्यांना वेळेत व दर्जेदार घरे मिळावीत, यासाठी मंडळाने ठोस पावले उचलावीत, असे स्पष्ट निर्देश त्यांनी यावेळी दिले.

###

(वैशाली गडपाले)
मुख्य जनसंपर्क अधिकारी / म्हाडा

---

सोशल मिडियावर आम्हाला फॉलो करा :

@mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial

D:\Documents\Press Release\44-2025 Minister of State Pankaj Bhoyar review meeting.docx

**Maharashtra Housing & Area Development Authority**
Public Relations Department
Room No. 19/20, Ground Floor, Gruhnirman Bhavan, Kala Nagar, Bandra East,
Mumbai-400051. Phone No:- 022 66405066/77 Email : cpromhadaoffice@gmail.com

=================================================================

Outward No. : 742/44 Dt. April 8, 2025

Press Release

**Minister of State for Housing, Dr. Pankaj Bhoyar reviews implementation of MHADA Mumbai Board Projects**

Clear instructions issued to ensure timely completion of redevelopment schemes and strengthen public service delivery mechanisms

Mumbai, April 8, 2025: Minister of State for Housing, Dr. Pankaj Bhoyar, visited MHADA headquarters in Bandra (East) today and conducted a detailed review of the ongoing schemes under the Mumbai Housing and Area Development Board. The meeting focused on project implementation, rehabilitation processes for beneficiaries, civic amenities, and key administrative protocols.

The review meeting was attended by Mr. Milind Borikar (IAS), Chief Officer, MHADA Mumbai Board; Mr. Anil Wankhede, Deputy Chief Executive Officer; Ms. Vandana Suryawanshi, Joint Chief Officer; along with senior officers and departmental staff concerned with project execution.

During the discussion, the Hon'ble Minister reviewed the various stages of ongoing redevelopment projects and associated beneficiary rehabilitation. He directed that all stages of implementation be executed within stipulated timelines and that necessary administrative action be initiated to ensure the timely delivery of housing units as per eligibility norms.

The Minister further instructed that grievance redressal systems, public engagement mechanisms, and overall service delivery be made more accountable, structured, and efficient. He emphasised that project planning and implementation must consistently align with public welfare priorities.

Dr. Bhoyar also issued directions to ensure close coordination with all relevant government agencies for project-related approvals, town planning permissions, and essential service linkages including electricity, water supply, and supporting infrastructure. He added that each project's implementation status must be submitted regularly to the Housing Department, with clearly documented execution details.

The Hon'ble Minister further stated that MHADA's housing initiatives form a critical part of the Government's broader urban development agenda. He reaffirmed that it is the

Board's responsibility to ensure that beneficiaries receive quality homes in a time-bound manner, in accordance with the Government's housing policies.

###

(Vaishali Gadpale)
Chief Public Relations Officer, MHADA






म्हाडा





------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**Follow us on :**

@mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial @mhadaofficial

D:\Documents\Press Release\44-2025 Minister of State Pankaj Bhoyar review meeting.docx